प्रेस नोट दिनांक ०४/०७/२०२२

**तहसिल कार्यालय, वसई येथील लोकसेवक प्रदिप दामोदार मुकणे, वय-५३, पद- नायब तहसिलदार, वर्ग-२ यांना लाचेची मागणी केल्याने व लोकसेवक श्री संजय राजाराम सोनावणे, वय-५३, पद-मंडळ अधिकारी, माणिकपूर वर्ग-३ यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतलेबाबत**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक<br>गुन्हा नोंद क्रमांक | ठाणे युनिट |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक प्रदिप दामोदार मुकणे, वय-५३, पद- नायब तहसिलदार, वर्ग-२ तहसिल कार्यालय वसई, ता. वसई, जि पालघर<br>२) लोकसेवक श्री. संजय राजाराम सोनावणे, वय-५३, पद-मंडळ अधिकारी, वर्ग-३, माणिकपूर, ता. वसई, जि पालघर |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | आरोपी क्रमांक १ यांनी १,५०,०००/-रू व<br>आरोपी क्रमांक २ यांनी १,९०,०००/-रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | आरोपी क्रमांक २ यांनी १,५०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिकत | दिनांक २०/०५/२०२२ रोजी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे मालक यांनी विकत घेतलेली जमीन, गाव मौजे गोखिवरे, सर्व्हे नं. २३३, हिस्सा नं अ/३,क्षेत्र १.२०० हे.आर.प्र., या जमिनीचे फेरफार क्र. ४३३२ रद्द करणेकामी तक्रारदार यांचेकडून २,००,०००/- रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली असलेबाबत लेखी तक्रार दिली होती<br>त्या अनुषंगाने दिनांक २२/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. संजय राजाराम सोनावणे यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित कामाची पुर्तता करून देण्यासाठी २,००,०००/-रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती १,९०,०००/-रू मागणी करून, स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले<br>त्यानंतर दिनांक ३०/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. प्रदिप दामोदार मुकणे, नायब तहसिलदार यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित कामाची पुर्तता करून देण्यासाठी २,००,०००/-रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती १,५०,०००/-रू मागणी करून, स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले<br>त्या अनुषगाने आज दिनांक ०४/०७/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संजय राजाराम सोनावणे, मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी तक्रारदार यांचेकडुन १,५०,०००/-रू. स्विकारल्याने त्यांना १५:०० वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक प्रदिप दामोदर मुकणे, नायब तहसिलदार, वसई तहसिल कार्यालय यांना तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याने त्यांना १६:२० वा. ताब्यात घेण्यात आले |

**मार्गदर्शन अधिकारी:-मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले सो.,पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि,ठाणे परिक्षेत्र,ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा


**संपर्क पत्ता** :- ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१.

**संकेतस्थळ** :- acbmaharashtra@mahapolice.gov.in

**ई-मेल** - spacbthane@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार**

**ॲप्लीकेशन** - acbmaharashtra.net

**टोल फ्री नंबर** - १०६४.

**दुरध्वनी क्रमांक** - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

**व्हॉटस् ॲप क्रमांक** - ९९३०९९७७००.


Mprajapati

**(मनोजकुमार प्रजापती)**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**